पंचवार्षिक बृहत आराखडे तसेच वार्षिक योजनांची अंमलबजावणी, पाठपुरावा व कालबध्द मूल्यांकन करण्यासाठी समिती स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक: बृआमा-२०१८/प्र.क्र.२८१/विशि-३,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: १० जून २०१९.

वाचा : - मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली दि.१०.९.२०१८ रोजी महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या (माहेड) बैठकीचे इतिवृत्त

प्रस्तावना :-

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ७६ अन्वये मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण विकास आयोगाची (माहेड) तसेच कलम १०७ अन्वये प्रत्येक सार्वजनिक विद्यापीठाने तयार करावयाचे पंचवार्षिक बृहत आराखडे व बिंदू निदेशक वार्षिक आराखडे याबाबतची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार सर्व सार्वजनिक विद्यापीठांचे हे आराखडे महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाने मंजूर करावयाचे असतात.

या तरतूदीनुसार दिनांक १० सप्टेंबर, २०१८ रोजी माहेडची बैठक मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार पंचवार्षिक बृहत आराखडे तसेच वार्षिक योजनांची अंमलबजावणी, पाठपुरावा व कालबध्द मूल्यांकन करण्यासाठी नवीन समितीची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर मंजूर पंचवार्षिक बृहत आराखडे व वार्षिक बिंदूनिदेशक आराखडयांच्या अंमलबजावणीस प्रारंभ झाला असून आयोगाच्या बैठकीत ठरल्यानुसार विशेष समिती गठीत करण्याची गरज असून त्याअनुषंगाने समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

पंचवार्षिक बृहत आराखडे तसेच वार्षिक योजनांची अंमलबजावणी, पाठपुरावा व कालबध्द मूल्यांकन करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	समिती सदस्यांचे नांव	पद
१	प्रा.डॉ.बी.एन.जगताप, आयआयटी मुंबई	अध्यक्ष
२	प्रा. डॉ.विलास गायकर, इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नोलॉजी, मुंबई.	सदस्य
३	प्रा.डॉ.डी.टी शिर्के, प्र-कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	सदस्य
४	प्रा.डॉ.आर.डी कुलकर्णी, प्र-कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई	सदस्य
५	श्री.राम भोगले, उद्योजक	सदस्य
६	प्रा.अमिता भिडे, टी.आय.एस.एस मुंबई	सदस्य
७	प्राचार्य श्री.अनिल राव, शिक्षण तज्ञ, जळगांव	सदस्य

८	श्री.आनंद मापुस्कर, शिक्षणतज्ञ, मुंबई	सदस्य
९	श्री.सिध्दार्थ खरात, सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,	सदस्य
१०	डॉ.धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण, पुणे	समन्वयक

समितीची उद्दिष्टे व कार्यकक्षा-

१. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमाच्या कलम १०७ अन्वये पंचवार्षिक बृहत आराखडयांची उद्दिष्टे स्पष्ट करण्यात आली असून अशा उद्दिष्टांची पुर्तता करण्यासाठी विद्यापीठांना मार्गदर्शन करणे.

२. माहेडव्दारा मंजूर पंचवार्षिक बृहत आराखडे व वार्षिक बिंदूनिदेशक आराखडयांच्या योग्य अंमलबजावणीकरिता मार्गदर्शन करणे, पाठपुरावा करणे.

३. सार्वजनिक विद्यापीठांनी यासंदर्भात तयार केलेले कृती कार्यक्रमांचे कालबध्द मूल्यांकन करणे.

४. विद्यापीठ व महाविद्यालये शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांमध्ये पंचवार्षिक बृहत आराखडयांसंदर्भात जागृती, सकारात्मक सहभागासाठी प्रेरणा देणे व त्यासाठी कार्यशाळा चर्चासत्र इ.आयोजित करणे.

५. पंचवार्षिक बृहत आराखडयांतील विविध उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी प्रस्तावित योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन करणे व पाठपुरावा करणे.

६. विद्यापीठांनी तयार केलेल्या पंचवार्षिक बृहत आराखडयात अथवा प्रस्तावित बिंदूनिदेशक वार्षिक आराखडयात बदल, दुरुस्त्या, सुधारणा सुचविणे.

७. समितीचा कार्यकालावधी ५ वर्षे इतका राहील.

८. समितीने वार्षिक कार्यअहवाल आयोगास सादर करावा.

९. सदर समितीस आवश्यकतेनुसार विद्यापीठनिहाय अथवा एकत्रित राज्यस्तरीय बैठकी, चर्चासत्रे, कार्यशाळा इ.आयोजित करता येतील व ज्या विद्यापीठात असे आयोजन करण्यात येईल त्या विद्यापीठानी समिती सदस्यांचे आवश्यक ते मानधन व अनुज्ञेय भत्ते आपल्या विद्यापीठ निधीमधून अदा करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६१०१२३८०६८२०८ आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SIDDHARTH KHARAT

Digitally signed by SIDDHARTH KHARAT
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=6f8cb55012423727bece629d954713c1ec2962a9ca9b909643170e56321cfd24, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=22c1b7c1413e77554a8e64cbc60b74fb6471605c32acf8b9b51b2b018fefdc0b, ou=H AND TED, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SIDDHARTH KHARAT
Date: 2019.06.10 12:45:21 +05'30'

(सिध्दार्थ खरात)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे उप सचिव, राजभवन, मलबार हील, मुंबई,

२. मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे प्रधान सचिव.

३. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण तथा उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव.
४. मा. मंत्री, वित्त विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव.
५. मा. मंत्री, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव.
६. मा. मंत्री, उद्योग विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव.
७. मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव.
८. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव.
९. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव.
१०. मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव.
११. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.
१२. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.
१३. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.
१४. अपर मुख्य सचिव, उद्योग विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.
१५. प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.
१६. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.
१७. सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.
१८. प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, महाराष्ट्र राज्य , मुंबई.
१९. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.
२०. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.
२१. संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.
२२. सहसचिव, विद्यापीठ अनुदान आयोगाचे पश्चिम क्षेत्रिय कार्यालय तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.